नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS


वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १८७ Issue - 187 | वार गुरुवार दि. २७ नोव्हेंबर २०२५ Blow- Thursday Date 27 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महापालिका मतदार याद्यांतील घोळ समोर, सूचना व हरकतीला मुदतवाढ

## निवडणूक आयोगाचा महत्त्वाचा निर्णय; ठाकरेंचा दाव खरा, मुंबईत ११ लाख दुबार मतदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचाराची रणधुमाळी अंतिम टप्प्यात असून आता जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकांचे वेध सर्वांनाच लागले आहेत. त्यासाठी, राजकीय पक्ष देखील कामाला लागले आहेत. निवडणूक आयोगाने यापूर्वी प्रारुप मतदार याद्या जाहीर केल्या आहेत. मात्र, या मतदार याद्यांमध्ये अद्यापही घोळ आणि दुबार मतदारांची संख्या मोठी असल्याने आता नव्याने मतदार प्रारुप याद्या तयार करण्यात येणार आहेत. कारण, एकट्या मुंबईतच ११ लाख दुबार मतदार आढळून आल्याने ठाकरे बंधूंचा दावा खरा ठरला आहे. आता, मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम आयोगाकडून जाहीर करण्यात आलाय. यापूर्वी अंतिम मतदार यादीसाठी ५ डिसेंबर ही तारीख होती, आता २० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार, प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम तारीख ३ डिसेंबर २०२५ असणार आहे. प्रारूप मतदार यादीवरील दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या आधी प्रमाणित करून प्रसिद्ध करण्याचा दिनांक १० डिसेंबर २०२५ असेल. मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करणे १५ डिसेंबर आणि मतदान केंद्रानिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे २२ डिसेंबर २०२५ असणार आहे. महापालिका निवडणुकांसाठी आधी मतदार याद्या प्रसिद्ध करण्याची तारीख ६ नोव्हेंबर २०२५ ठरली होती. त्यानंतर, ती पुढे ढकलत २० नोव्हेंबरला निवडणूक आयोगाने यादी प्रसिद्ध केली. मात्र, या यादीत घोळ असल्याने हरकती घेत निवडणूक आयोगाकडे नव्याने प्रारुप यादी तयार करण्यासाठी महापालिकेने वेळ मागितला होता. त्यानुसार, नवीन सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यापूर्वी

मुंबई महापालिकेच्या मतदारयादीत तब्बल ११ लाख दुबार नावं असल्याची धक्कादायक माहिती महापालिकेकडून देण्यात आली आहे. दुबार नावांमुळे यादी स्वच्छ करण्यासाठी महापालिकेनं आता वेळही मागितला. तसेच एकाच व्यक्तीचे नाव दोनदा-तीनदा नव्हे, तर १०३ वेळा मतदारयादीत असल्याची माहितीही समोर आली आहे. मुंबईत तब्बल ४ लाख ३३ हजार व्यक्तींची नावे मतदार म्हणून एकापेक्षा अधिक वेळा नोंदवली गेली आहे. त्यामुळे मनसेप्रमुख राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दुबार मतदार असल्याचा केलेला दावा खरा असल्याचं समोर आलं आहे. त्यानंतर, आता निवडणूक आयोगाने प्रारुप मतदार यादी जाहीर करण्याचा सुधारीत कार्यक्रम हाती घेतली आहे. त्यानुसार, ३ डिसेंबरपर्यंत आता मतदार यादीवर हरकती व सूचना घेण्यात येतील.

## आठ हजाराची लाच स्वीकारताना तालुका कृषी अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाडीबीटी पोर्टलवर शेतीसाठी मिळणाऱ्या अनुदानाच्या अर्जाला पूर्व मंजुरी देण्यासाठी १० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी धनंजय सुभाष शेटे (वय ३१) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) सोलापूर युनिटने रंगेहात पकडले. तडजोडीअंती ८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली.

तक्रारदार यांचे वडील यांनी कृषी विभागाकडून मिळणाऱ्या शेती अवजारांसाठी 'आपले सरकार' पोर्टलमार्फत ऑनलाईन अर्ज केला होता. या अर्जाला महाडीबीटी पोर्टलवर पूर्व मंजुरी देण्यासाठी आरोपी शेटे यांनी २५ नोव्हेंबर रोजी १० हजारांची मागणी केली होती. तडजोड झाल्यानंतर ८ हजार रुपये घेण्याचे ठरले. बुधवारी (दि. २६) रोजी उत्तर सोलापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कक्षात आरोपी शेटे समोरील टेबलवरील कागदांमध्ये ठेवलेली ८ हजारांची रक्कम स्वीकारताना एसीबी पथकाने त्यांना सापळा रचून रंगेहात पकडले. आरोपीविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ अंतर्गत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई एसीबी पुणे शिरीष सरदेशपांडे, एसीबी पुणे अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील, पर्यवेक्षण अधिकारी एसीबी सोलापूरचे पोलीस उपाधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शैलेश पवार, रविंद्र लांभाते, पोह. सलीम मुल्ला, पोह. श्रीराम घुगे, पोह. स्वामीराव जाधव, पोशि. राजू पवार, चापोशि. अक्षय श्रीराम यांनी केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आवाहन केले आहे की, लाच मागणाऱ्या कोणत्याही लोकसेवकाबद्दल माहिती असल्यास नागरिकांनी त्वरित एसीबी शी संपर्क साधावा.

## २०३० राष्ट्रकुल स्पर्धेच्या यजमानपदी भारताची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारत २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेचे आयोजन करणार आहे. स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा सर्वसाधारण सभेत अहमदाबाद शहराच्या नावावर औपचारिक शिक्कामोर्तब झाले. भारताला २० वर्षांनंतर कॉमनवेल्थ गेम्सच्या आयोजनाची संधी मिळाली आहे. भारताने यापूर्वी २०१० मध्ये दिल्ली येथे कॉमनवेल्थ गेम्सचे आयोजन केले होते. यावेळी हे आयोजन अहमदाबादमध्ये होणार आहे, जिथे गेल्या दशकात क्रीडा पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करण्यात आला आहे.

राष्ट्रकुल स्पर्धेत ब्रिटिशांच्या वसाहती असलेल्या ७२ देशांचे खेळाडू भाग घेतात. २०३० च्या आयोजनासाठी भारताचा सामना नायजेरियातील अबुजा शहराशी होता. मात्र, कॉमनवेल्थ स्पोर्टने नायजेरियाला २०३४ च्या स्पर्धेसाठी विचारात घेण्याचा निर्णय घेतला.

२०२६ च्या राष्ट्रकुल स्पर्धेतून भारताचे वर्चस्व असलेले अनेक खेळ वगळण्यात आले आहेत. २०२६ च्या ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेचे बजेट मर्यादित ठेवण्यात आले आहे आणि त्यात केवळ १० खेळांचा समावेश आहे. यामध्ये कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन आणि हॉकी यांसारख्या खेळांना वगळण्यात आले आहे, ज्याला भारताने तीव्र विरोध केला होता. मात्र, भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने (खज) स्पष्ट केले आहे की भारत २०३० च्या स्पर्धेत पुन्हा त्या सर्व खेळांचा समावेश करेल. खज चे संयुक्त सचिव कल्याण चौबे यांनी सांगितले होते की नेमबाजी, कुस्ती, तिरंदाजी यांसारख्या खेळांसोबतच कबड्डी आणि खो-खो यांसारख्या पारंपरिक खेळांनाही जोडण्याची योजना आहे. अहमदाबादमध्ये तयारीला वेग आला आहे. गेल्या काही महिन्यांत अहमदाबादने राष्ट्रकुल वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप, एशियन एक्वाटिक्स चॅम्पियनशिप आणि एएफसी यू-१७ एशियन कप क्वालिफायर्स यांसारख्या स्पर्धांचे आयोजन केले आहे.

आगामी काळात येथे एशियन वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप, आशिया पॅरा-आर्चरी कप आणि २०२९ वर्ल्ड पोलीस अँड फायर गेम्सचेही आयोजन केले जाईल. सरदार वल्लभभाई पटेल स्पोर्ट्स एन्क्लेव्हमध्ये एक मोठा क्रिडा परिसर विकसित केला जात आहे. यामध्ये जगातील सर्वात मोठे नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियम, एक्वाटिक्स सेंटर, फुटबॉल स्टेडियम आणि इनडोअर एरिनाज तयार होतील. ३,००० खेळाडूंसाठी ॲथलीट व्हिलेज देखील याच परिसरात बांधले जाईल.

## ८ फेब्रुवारीची परीक्षा रद्द, शिष्यवृत्ती परीक्षेची नवी तारीख जाहीर; राज्य परीक्षा परिषदेचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ ऐवजी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यभर एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. त्यामुळे, शिष्यवृत्ती परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी नव्या वेळापत्रकानुसार आपल्या पाल्यांसाठी परीक्षाचे नियोजन करणे गरजेचे आहे.



केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) तर्फे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) देखील ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. राज्यातील अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सीटीईटी परीक्षेला बसणार असल्याने त्यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेचा दिवस बदलत नवीन तारीख २२ फेब्रुवारी २०२६ जाहीर केली आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शाळांनी व परीक्षा केंद्रांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागामार्फत शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते. शिष्यवृत्ती परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत मिळवण्याची एक स्पर्धाच. ज्या विविध स्तरांवर घेतल्या जातात. या परीक्षांच्या आधारे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी किंवा इतर गरजांसाठी आर्थिक मदत मिळते. महाराष्ट्रात, राज्य शिक्षण विभागातर्फे चौथी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतल्या जातात, तर राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षा आणि इतर अनेक राष्ट्रीय योजनांद्वारे शिष्यवृत्ती दिल्या जातात.

## न्यायालयाने उज्ज्वला थिटेंचा अपील अर्ज फेटाळला; अनगर नगराध्यक्षपदाची निवड बिनविरोधच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्ह्यातील अनगर नगरपंचायत नगराध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उज्ज्वला थिटे यांनी सोलापूर सत्र न्यायालयात धाव घेतली होती. आपल्या उमेदवारीचा अर्ज बाद केल्यानंतर त्यांच्या अर्जावरील अपील संदर्भातील सर्व बाजूचे युक्तिवाद आज न्यायालयात पूर्ण झाले आहेत. न्यायाधीशानी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उज्ज्वला थिटे यांचा अपील अर्ज फेटाळला आहे. जिल्हा न्यायाधीश प्रशांत राजवैद्य यांनी उज्वला थिटे यांची अपील फेटाळत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय कायम ठेवला. दरम्यान, उमेदवारी अर्जावरील सही खोडण्यात आल्याचा आरोप याचिकाकर्त्याने केला होता. मात्र, जर सही खोडली असा तुमचा आरोप असेल तर उमेदवाराने पोलिसांत तक्रार दाखल करायला पाहिजे, असा युक्तिवाद इथे सरकारी वकिलांकडून करण्यात आला.

जिल्हा न्यायाधीश प्रशांत राजवैद्य यांच्या कोर्टासमोर उज्वला थिटे, प्राजक्ता पाटील आणि सरकार पक्षाच्यावतीने तिन्ही वकिलांचे युक्तिवाद पूर्ण झाले. आज सकाळपासून या प्रकरणावर युक्तिवाद सुरु होता. जवळपास ४ तास युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीशनी याप्रकरणी निकाल दिला. त्यामुळे, गेल्या ८ दिवसांपासून अनगर नगरपालिकेवरील नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्राजक्ता पाटील यांच्या बिनविरोध निवडीवर कोर्टाची टांगती तलवार होती. मात्र, आता त्यांची निवड बिनविरोधी विजयी झाल्याचं शिक्कामोर्तब झालं आहे. दरम्यान, आम्हाला ऑपरेटिव्ह ऑर्डर कोर्टाने सांगितली, आमचा अपील अर्ज फेटाळण्यात आला आहे. कोर्टाने काय ग्राउंडवर हा निर्णय दिला हे आम्हाला उद्या सविस्तर ऑर्डर आल्यावरच समजेल, अशी प्रतिक्रिया उज्ज्वला थिटे यांचे वकील दत्तात्रय घोडके यांनी निर्णयानंतर दिली.



उज्वला थिटे यांचे वकील दत्तात्रय घोडके यांच्या वतीने जवळपास दीड तास कोर्टासमोर युक्तिवाद करण्यात आला. उज्वला थिटे यांना उमेदवारी अर्ज दाखल करताना काय काय अडचणीत आल्या हे त्यांनी कोर्टासमोर निदर्शनास आणले. याशिवाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कशा पद्धतीने कारभार केला. या संदर्भात अनेक तक्रारीचा पाढा वकिलांनी वाचला. दरम्यान, प्रशासकीय यंत्रणेने फ्रॉड करून सही गायब केल्याचा दावा देखील वकिलांनी कोर्टासमोर केला होता. उज्वला थिटे यांच्या वकिलांनी दीड तास केलेल्या युक्तिवादनंतर सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी आपली बाजू मांडली.

उज्वला थिटे यांच्या वकिलांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर बोलताना सरकारी वकिलांनी प्रतिउत्तर दिलं. जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांविरोधात तक्रार होती तर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक आयोगाकडे तक्रार का केली नाही? असा सवाल राजपूत यांनी न्यायालयात उपस्थित केला. उज्वला थिटे या राष्ट्रवादी पक्षाच्या उमेदवार आहेत, जर त्यांच्यावर दबाव होता तर पक्षाने का कोणती भूमिका घेतली नाही. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जे काम केलं ते सर्व आयोगाच्या नियमानुसार केलं आहे. त्यामुळे उज्वला थिटे यांचे अपील फेटाळण्यात यावे अशी मागणी सरकारी वकिलांनी केली होती. दरम्यान, सरकारी वकील यांच्या युक्तिवादनंतर राजन पाटील यांच्या सून प्राजक्ता पाटील यांचे वकील ॲड. महेश जगताप यांनीही युक्तिवाद केला.

संबंधित प्रकरणात आमच्या उमेदवार प्राजक्ता पाटील यांचा काहीही संबंध नाही. कारण, उमेदवाराच्या अर्जावर आक्षेप हा अपक्ष उमेदवाराने घेतला होता. ज्या उमेदवाराने आपला अर्ज काढून घेतला आहे, असे प्राजक्ता पाटील यांचे वकील ॲड. महेश जगताप यांनी म्हटले. तसेच, सबंधित प्रकरणातील उमेदवार उज्ज्वला थिटे ह्या राष्ट्रवादीच्या उमेदवार आहेत. सध्याचे राष्ट्रवादाचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी राष्ट्रवादीचे माजी जिल्हाध्यक्ष असलेल्या राजन पाटील यांच्याविरुद्ध राजकीय हेतू बाळगत हे कुबाड रचलं आहे, असेही वकील जगताप यांनी म्हटले.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच



मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी

मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### भारताला यजमानपद

भारत २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेचे आयोजन करणार आहे. स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा सर्वसाधारण सभेत अहमदाबाद शहराच्या नावावर औपचारिक शिक्कामोर्तब झाले. भारताला २० वर्षांनंतर कॉमनवेल्थ गेम्सच्या आयोजनाची संधी मिळाली आहे. भारताने यापूर्वी २०१० मध्ये दिल्ली येथे कॉमनवेल्थ गेम्सचे आयोजन केले होते. यावेळी हे आयोजन अहमदाबादमध्ये होणार आहे, जिथे गेल्या दशकात क्रीडा पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करण्यात आला आहे. राष्ट्रकुल स्पर्धेत ब्रिटिशांच्या वसाहती असलेल्या ७२ देशांचे खेळाडू भाग घेतात. २०३० च्या आयोजनासाठी भारताचा सामना नायजेरियातील अबुजा शहराशी होता. मात्र, कॉमनवेल्थ स्पोर्टने नायजेरियाला २०३४ च्या स्पर्धेसाठी विचारात घेण्याचा निर्णय घेतला. २०२६ च्या राष्ट्रकुल स्पर्धेतून भारताचे वर्चस्व असेलेले अनेक खेळ वगळण्यात आले आहेत. २०२६ च्या ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेचे बजेट मर्यादित ठेवण्यात आले आहे आणि त्यात केवळ १० खेळांचा समावेश आहे. यामध्ये कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन आणि हॉकी यांसारख्या खेळांना वगळण्यात आले आहे, ज्याला भारताने तीव्र विरोध केला होता. मात्र, भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने (खज) स्पष्ट केले आहे की भारत २०३० च्या स्पर्धेत पुन्हा त्या सर्व खेळांचा समावेश करेल. खज चे संयुक्त सचिव कल्याण चौबे यांनी सांगितले होते की नेमबाजी, कुस्ती, तिरंदाजी यांसारख्या खेळांसोबतच कबड्डी आणि खो-खो यांसारख्या पारंपरिक खेळांनाही जोडण्याची योजना आहे. अहमदाबादमध्ये तयारीला वेग आला आहे. गेल्या काही महिन्यांत अहमदाबादने राष्ट्रकुल वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप, एशियन एक्वाटिक्स चॅम्पियनशिप आणि एएफसी यू-१७ एशियन कप क्वालिफायर्स यांसारख्या स्पर्धांचे आयोजन केले आहे. आगामी काळात येथे एशियन वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप, आशिया पॅरा-आर्चरी कप आणि २०२९ वर्ल्ड पोलीस अँड फायर गेम्सचेही आयोजन केले जाईल. सरदार वल्लभभाई पटेल स्पोर्ट्स एन्क्लेव्हमध्ये एक मोठा क्रिडा परिसर विकसित केला जात आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात संविधान दिन उत्साहात साजरा!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात संविधान दिन उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ उभारलेल्या संविधान उद्देशिकेच्या स्तंभास कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे आदी मान्यवर उप-स्थित होते.

कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने विद्यापीठ कॅम्पसमधून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीदरम्यान संविधानाचा जयघोष करत संविधानाबद्दल जनजागृती करण्यात आली.

यानंतर संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपात कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी संविधान मूल्यांचे महत्त्व अध-ोरेखित करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. संविधान दिनाच्या उपक्रमांमुळे विद्यापीठ परिसर देशभक्तीच्या आणि लोकशाहीच्या मूल्यांनी भारून गेला होता.

## डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने भारतीय संविधान दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : संविधानाची जनजागृती व्हावी, त्या विषयी सर्वांना महत्व कळावे, संविधानाचे मूल्ये प्रत्येकामध्ये रुजावित तसेच शासनाच्या निर्देशनाचे पालन करून डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतिच्या वतीने भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी सकाळी संविधान जनजागृती बाबत प्रभातफेरी काढण्यात आली होती. तर जिल्हा परिषद डोहोळेपाडा मराठी शाळेतील विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. तर विशेष म्हणजे डोहोळे ग्रामपंचायतिच्या आवारात संविधान उद्देशीका भिंत तयार करण्यात आली आहे. तर यावेळी विद्यार्थ्यांनी हातात संविधान प्रास्ताविकेचे पोस्टर घेऊन संविधान मूल्ये रुजविण्याचा सामाजिक संदेश दिला.

सदर कार्यक्रम डोहोळेपाडा ग्राम पंचायतचे पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला असून, यावेळी सरपंच सुमन वाघे, प्रभारी सरपंच दिनेश ठाकरे, डोहोळेपाडा मराठी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रशेखर ढेंगळे, सहशिक्षिका संगिता ढेंगळे, वरिष्ठ लिपिक एकनाथ जाधव आणि सर्व सहकारी कर्मचारी उपस्थित होते.

## ईटकुर येथे संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील इटकुर येथे, आज दि.२६ नोव्हेंबर रोजी भारतीय राज्यघटनेला ७६ वर्षे पूर्ण झाले, त्या त्यानिमित्ताने आज मोठ्या उत्स-ाहात संविधान दिन साजरा करण्यात आला. या

वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला तरुण कार्यकर्ते आदित्य रणदिवे,नाना लगाडे, निलेश शिरसट, बाळराजे सोनवणे, यांच्या हस्ते पुष्प हार अर्पण करून

संविधान दिनाचे महत्त्व ज्येष्ठ नेते आत्माराम रणदिवे यांनी जमलेल्या तरुणाईला सांगीतले, त्रिशरण ,पंचशील वैजीनाथ शिंदे यांनी घेऊन त्यानंतर आदर्श शिक्षक, तुकाराम शिंदे यांनी संविधानाच्या प्रतीचे वाचन सर्वांसोबत केले. या कार्यक्रमाला भीमनगर मधील सर्व तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.



## डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने भारतीय संविधान दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालय,रेणापूर ता . रेणापूर जि.लातूर येथे आज दि.२६, रोजी संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानावर आधारित स्पर्धा परीक्षेचं आयोजन करण्यात आले. आणि त्यानंतर संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व भारतीय राज्य घटनेच्या ग्रंथाचे पूजन करून, प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या वेळी डी. एल एड प्रथम,द्वितीय वर्षातील व बी एड प्रथम वर्ष ,द्वितीय वर्षातील छात्र अध्यापकांनी या वेळी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य, डॉ. कैलास मोटे सर हे उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी रेणुका अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य रतन लहाने सर उपस्थित होते.

या वेळी प्रा उमेश रणदिवे,प्रा रमाकांत गायकवाड,प्रा यो-गेश माने, राधिका माने मॅडम, अजय बद्दर्,अभिषेक जाधव, दत्ता चादरे व छात्र अध्यापक यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी एड छात्र अध्यापक सत्यम गडदे यांनी केले तर आभार प्रदर्शन छात्र कु. रेणुका जोशी यांनी केले.

## ग्रंथपाल देवानंद जाधव यांच्यातर्फे विविध शाळांना संविधान वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : संविधानाची जनजागृती व्हावी, त्या विषयी सर्वांना महत्व कळावे, संविधानाचे मूल्ये प्रत्येकामध्ये रुजावित म्हणून खडवली, भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथपाल देवानंद जाधव यांच्या तर्फे कल्याण तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र खडवली तसेच प्राथमिक शाळा वावे-घर, खडवली, नडगाव, टिटवाळा, आश्रमशाळा खडवली तसेच भिवंडी तालुक्यातील वज्रेश्वरी येथील कन्या महाविद्यालय, प्राथमिक शाळा दिघाशी, खरिवली, खांबाळा ठिकाणी संविधान दिनानिमित्त भारतीय संविधान वाटप यावेळी खडवली येथील भारतीय सैनिकी विद्यालयाचे ग्रथपाल देवानंद जाधव यांनी ही संविधान प्रत्येक ठिकाणी भेट देऊन संविधानाची मूल्ये रुजविण्यासाठी भारतीय संविधानाची जनजागृती केली.



## डुबेरे येथील जनता विद्यालयात 'संविधान दिन' विविध कार्यक्रमांनी साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात' संविधान दिन ' उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते. व्यासपीठावर पर्यवेक्षिका जयश्री पगारे, जेष्ठ शिक्षक मारुती डगळे, सोमनाथ गिरी, सुनिल ससाणे, रामदास वारुंगसे, रेखा खंडीझोड आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते संविधानाचे ग्रंथाचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते. संविधानाची निर्मिती, संविधानातील विविध कलमे, मुलभूत हक्क, संविधानाचे महत्त्व, संविधान दिन का साजरा करतात याविषयी मुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षिका पगारे यांनी सविस्तर माहिती दिली. उपशिक्षिका जयश्री गोहाड यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी संविधान प्रतिज्ञा दिली. हरेश वाजे, वेदांत वारुंगसे, ऋतुजा कडभाने या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी गाडेकर हिने केले तर आभार अक्षदा जगधने हीने मानले. यावेळी कार्यक्रमास विद्यालयातील डी. ए.रबडे,रेवणनाथ कांगणे, किशोर शिंदे, ज्ञा-नेश्वर कडभाने, अरुण जारस, संकेत जाधव आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.



## पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीतील तीर्थ क्षेत्र विकास आघाडीच्या प्रचारास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या निवडणुकीच्या रणधुमाळी चांगला तरंग भरलेला असून प्रचारात खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात प्रमाणात चुरस प्रचारात खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात चुरस पहावयास मिळत आहे.

तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्ष उमेदवार डॉ. प्रणिती भालके यांनी पंढरपूर शहरातील विविध भागातील प्रचार फेरीत आघाडी घेतली आहे तर तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगरसेवक उमेदवार तसेच नागरिक मतदार बालके प्रेमी नागरिक युवा युती यांचा मोठा सहभाग दिसून येत आहे.

तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्ष व नगरसेवक उमेदव-ारास विविध सामाजिक संघटना तसेच कार्यकर्ते नागरिक यांचा पाठिंबा यामुळे तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे उमेदव-ार विजय होणार याची चाहूल दिसून येत आहे. मतदार यांना आव्हान करताना त्यांनी माध्यम प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की पंढरपूर नगरपरिषद निवडणूक अटीतटीची असून सामान्य जनता माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे मी पंढरपूर शहरातील विविध समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहे तसेच शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वांनी सोबत घेऊन केला जाईल तीर्थक्षेत्र आघाडीस सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा मिळत आहे यावेळी त्यांच्या समवेत तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे उमेदवार कार्यकर्ते नागरिक व युवा युती महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीत भाजप पक्षाचे अधिकृत उमेदवार शामल शिरसाट यांच्या प्रचारार्थ उस्फुर्तपणे प्रतिसाद






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या निवडणुकीच्या रणधुमाळी चांगला रंगत भरलेला असून प्रचारात खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात सुरूच निर्माण झालेली आहे.

पंढरपूर भाजपच्या प्रचार फेरीमध्ये सोलापूर जिल्ह्याचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक माजी नगराध्यक्ष लक्ष्मण भाऊ शिरसाट, तसेच आजी-माजी नगरसेवक मोठ्या प्रमाणात या रॅलीमध्ये उपस्थित होते.

प्रचार रॅलीमध्ये विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व भाजप कार्यकर्ते सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रत्येक चौकाचौकांमध्ये या भाजपच्या नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ शामल शिरसाठ यांचा येतोचित सन्मान प्रत्येक ठिकाणी करण्यात आला . यावेळी त्या भागातील सामाजिक कार्यकर्ते व आजी-माजी नगरसेवक हेही मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून रॅलीला बहुमोल मतदारांचे जास्तीत जास्त पाठिंबा सामाजिक संघटनेमधून त्यांना मिळत आहे व भाजपचे उमेदवार विजयी होणार याची चाहूल दिसून येत आहे मतदार यांना सर्व स्वतः भाजपच्या ताब्यात आहे त्यामुळे केंद्र सरकारची ही सत्ता भाजपच्या ताब्यात आहे व महाराष्ट्रातले सत्ता पाजीता ताब्यात आहे त्यामुळे येणारी ही निवडणूक व नगराध्यक्ष भाजपचा करा व शहराचा विकास मोठ्या प्रमाणात करण्याचे आश्वासन भाजप कार्यकर्ते व त्या फेरीतील अनेक सामाजिक कार्यकर्ते

पंढरपूरचा विकास पूर्णतः करण्यासाठी भाजपच्या नगराध्यक्ष यांना प्रचंड मताने निवडून देऊन पंढरपुरामध्ये राहिलेला विकास आणि जास्तीत जास्त पंढरपुरातील शहरातील मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी द्यावी असे भाजप कार्यकर्त्याकडून प्रत्येक रॅलीमध्ये प्रत्येक मतदाराला सांगून त्यांना मोठ्या प्रतिसाद रॅलीमध्ये मतदाराकडून मिळत असल्याचे दिसून येत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# संविधानामुळे विकसित भारताचे स्वप्न साकार होईल

## मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन; कल्याणशेट्टी महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : देशाचे सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य मध्ये रूपांतर झाले असून आता विकसित भारताचे स्वप्न साकार करावयाचे आहे. त्यासाठी डॉ आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेतील मूलभूत तत्वे आधारभूत ठरतील असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

**भारतीय घटनेमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्वत्तेचे दर्शन**

**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित,उपेक्षित पददलित, अस्पृश्य समाजाच्या वेदना अनुभवल्या होत्या म्हणून भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी वंचित समाजाला हक्क मिळवून दिले. म्हणून संविधान सर्वार्थाने परिपूर्ण आहे, आणि त्यातून त्यांच्या विद्वत्तेचे दर्शन घडते, असे मत आपल्या भाषणातून प्रा मधुबाला लोणारी यांनी व्यक्त केले.**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उद्योजक ओंकार पाटील, बसवराज बंडगर, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, संविधानामुळे देशातील नागरिकांना सामाजिक, राजनैतिक, आर्थिक हक्क मिळाले आहे, विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे, जाती धर्मामधील दरी कमी झाली आहे, त्यामुळे दरडोई आर्थिक उत्पन्न वाढले आहे, हीच खरी संविधानाची ताकद आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे त्यांनी केले तर आभार प्रा राजशेखर पवार यांनी मानले. कार्यक्रमास प्रा डॉ बाळासाहेब पाटील, हर्षदा गायकवाड, शिल्पा धूमशेट्टी, शितल फुटाणे व भीम सोनकांबळे उपस्थित होते.

**समाज परिवर्तनास गती मिळाली..**

संविधानाने नागरिकांना मूलभूत हक्क दिल्यामुळे समाजाची प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली, समाज परिवर्तनास गती मिळाली, आज झालेली चौफेर



प्रगती हे विकसित समाजाचे लक्षण आहे असे प्रतिपादन प्रा सौरभ भस्मे यांनी केले.

## थोडक्यात...

### घातक शस्त्रांचा वापर करणारा संजय उपाडे दोन वर्षासाठी तडीपार

सोलापूर : शहरात साथीदारांसह दंगा माजवत, मारामारी करणे, घातक शस्त्रांचा वापर करणारा संजय ऊर्फ संजीव नागनाथ उपाडे (वय ३४, रा. संतोष नगर, बाळे) याला सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे. याबाबतची माहिती सोमवारी वाचक अधिकारी पोलिस उपनिरीक्षक एन. एस. कानडे यांनी पत्रकाव्दारे दिली.आरोपी उपाडे याच्यावर २०१७, २०१८, २०१९, २०२१ व २०२४ मध्ये साथीदारांसह दंगा व मारामारी करणे, घातक शस्त्रांचा वापर करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यामुळे त्याच्या विरूध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्याकडून त्याच्या तडीपारचा प्रस्ताव पाठवण्यात आला होता. यामुळे त्याला पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी १७ नोव्हेंबर रोजी त्याला तडीपार करण्याचे आदेश दिले.

### आर्थिक कारणासाठी पत्नीचा छळ ; पतीसह सहा जणांवर गुन्हा

सोलापूर : आर्थिक कारणासाठी पत्नीचा छळ केल्याप्रकरणी पतीसह सहा जणांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात सोमवारी गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी मेहक अक्रम शेख (वय २१, रा. प्रभाकर नगर, नई जिंदगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अक्रम, सासू सायरा, जैनुद्दीन शेख, नणंद अल्फिया, आर्शिया, आयेशा सय्यद (रा. पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी मेहक यांचा विवाह झाल्यानंतर आरोपींनी घरगुती कारणावरून तसेच पैशाच्या कारणावरून त्यांना मारहाण केली. यात त्यांना मुक्कामार लागून शिवीगाळ दमदाटी करून शारीरिक व मानसिक त्रास दिला. अशा आशयाची फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून वरील आरोपींवर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास हवालदार राकेश पाटील करत आहेत.

## वाय.डी.बिटको गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये संविधान दिन विविध उपक्रमांनी साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : दि एज्युकेशन इन्स्टिट्यूट,नाशिक संचलित यशोदाम ता डायाभाई बिटको गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,नाशिक या शाळेत आज २६ नोव्हेंबर संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. असून शाळेचे उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी व ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक मिलिंद कोठावदे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस व भारताचे संविधानास पुष्पहार अर्पण करण्यात आला असून संविधान उद्देशिकेचे वाचन करून अभिवादन करण्यात आले.

ज्युनि. कॉलेजचे उपमुख्याध्यापक मिलिंद कोठावदे व मंजूश्री बच्छाव ,महेक शेलार ,.स्नेहा निकम , ज्ञानेश्वरी पवार या विद्यार्थिनींनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची व संविधान दिनाची माहिती सांगितली.इ.८वीच्या विद्यार्थिनींनी सुंदर असा संविधान पोवाडा सादर केला.तर आकर्षक रांगोळ्या काढून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश वैशंपायन ,उपाध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी ,सेक्रेटरी हेमंत बरकले ,शालेय समिती चेअरमन रमेश महाशब्दे , मुख्याध्यापिका सविता कुशारे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.शाळेचे उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी व ज्युनिअर कॉलेजचे उपमुख्याध्यापक मिलिंद कोठावदे ,पर्यवेक्षिका सुषमा गवारे ,गव्हर्निंग कौन्सिल सदस्य कैलास बागुल उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र जगताप यांनी तर सूत्रसंचालन चंदर बोरसे यांनी केले , आभार पंकज अहिरे यांनी मानले.

श्रीमती सायली मुळे यांनी फलक लेखन केले.असुन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचा पंढरपूर दौरा; उद्योग व व्यापार विभागाकडून स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. शशिकांत शिंदे साहेब यांनी आज पंढरपूर ला भेट दिली. यावेळी उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश दादा फाटे यांनी त्यांचे पंढरपूर येथे उत्साहात स्वागत व सत्कार केला.

या भेटीदरम्यान, नागेश दादा फाटे आणि शशिकांत शिंदे साहेब यांच्यात पंढरपूर येथील आगामी निवडणुकीसह विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा झाली. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, तालुकाध्यक्ष अतुल चव्हाण, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सागर पडगळ, तसेच सौ. नीता शामराव पडगळ, प्रणव गायकवाड यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. शिंदे यांच्या दौऱ्यामुळे पंढरपूरमधील पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे.

## अतिवृष्टी अनुदानासाठी विशेष शिबीर; सिंदखेड राजा तालुक्यात ईकेवायसी पूर्ण करण्याचे तहसीलदार यांचे आवाहन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा तालुक्यामध्ये अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेले शासकीय अनुदान मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा झाले आहे. मात्र, ज्या शेतकऱ्यांची शघधउ (इलेक्ट्रॉनिक नो युवर कस्टमर) प्रक्रिया प्रलंबित आहे, त्यांच्या खात्यात अद्याप हे अनुदान जमा झालेले नाही.

तहसीलदार सिंदखेडराजा श्री.अजित दिवटे यांनी अशा सर्व शेतकरी बांधवांना आवाहन केले आहे की, त्यांनी तात्काळ आपल्या जवळच्या सीएससी केंद्रावर (सामान्य सेवा केंद्र) जाऊन आपली ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. जेणेकरून त्यांना अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा होऊ शकेल.

ईकेवायसी प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यासाठी उद्या, दिनांक २७/११/२०२५ रोजी सिंदखेडराजा तालुक्यात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराची ठिकाणे: तहसील कार्यालय, सिंदखेडराजा, किनगाव राजा (मंडळ स्तर), दुसरबीड (मंडळ स्तर), सोनोशी (मंडळ स्तर), मलकापूर पांग्रा (मंडळ स्तर), शेंदुर्जन (मंडळ स्तर), साखरखेर्डा (मंडळ स्तर) श्री. अजित दिवटे, तहसीलदार सिंदखेडराजा यांनी सर्व शेतकरी बांधवांना या शिबिराचा लाभ घेऊन आपली ईकेवायसी प्रक्रिया त्वरित पूर्ण करावी आणि अनुदानापासून वंचित राहू नये, असे कळकळीचे आवाहन केले आहे.

## जि.प. प्राथमिक शाळा वागदरी येथे संविधान दिन विविध उपक्रमाने साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी एस.के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथे दि.२६ नोव्हेंबर संविधान दिन मोठ्या उत्साहाने व विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला असून या निमित्ताने या शाळेतून बदली होऊन अन्य ठिकाणी सेवेत रुजू झालेल्या सहशिक्षिका रेखा साखरे मॅडम व याच शाळेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका महादेवी जत्ते मॅडम यांचा सत्कार करण्यात आला व उपस्थित मान्यवरांना आणि शालेय विद्यार्थ्यांना या निमित्ताने सामाजिक कार्यकर्ते एस. के. गायकवाड यांच्या वतीने भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्यात आले.





भारतीय संविधान दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिना निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे विद्यमान सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून माझी उपसरपंच मीनाक्षीताई बिराजदार,सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार एस.के.गायकवाड शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा कोमल झेंडारे,बचत गटाच्या सीआरपी विद्या बिराजदार,आदी उपस्थित होते.

प्रारंभी भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर २६ नोव्हेंबर २०११ च्या दहशतवादी भ्याड हल्लूयात शहीद झालेले महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या निमित्ताने सामुदायिकरित्या संविधानाच्या उद्देशिका चे वाचन करून सह शिक्षिका रेखा साखरे मॅडम व सेवा निवृत्त मुख्याध्यापिक महादेवी जत्ते यांचा समस्त ग्रामस्थांच्या व शाळेच्या वतीने यथोचित सात्कार करण्यात आला.

या प्रसंगी एस.के. गायकवाड, महादेवी जत्ते,सहशिक्षिका रेखा साखरे, शाळेचे मुख्याध्यापक बि.बि. सगर व शालेय विद्यार्थी यांची भाषणे झाली. प्रास्ताविक व सुत्रसंचलन सहशिशिका एस.एस.मसे मॅडम यानी केले तर अभारप्रदर्शन सहशिक्षक डी.बी.अनपट यानी कोले.

यावेळी सहशिक्षक एन.एन. काळे, टी.एम. लोहार, शिक्षण प्रेमी पालक शीतल झेंडार, जिजाबाई लकडे, अंगणवाडीच्या पद्मिनीबाई पवार, रूपाली जाधव,अशा कार्यकर्ती पार्वती बिराजदार, पारुबाई शेख सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिलांच्या शाश्वत उपजीविकेसाठी 'उमेद-एमएसआरएलएम' व 'राह फाउंडेशन'चा सामंजस्य करार

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास शासनाचे प्रथम प्राधान्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना अर्थार्जनासाठी विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्राम विकास विभागांतर्गत उमेद अभियानांतर्गत काम सुरू आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक सक्षमता व शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान आणि राह फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार निश्चितच व्यापक प्रमाणावर विस्तार करण्यास सहायक ठरेल , असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक सक्षमता व शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान आणि राह फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील जनतेला आर्थिक विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. प्रामुख्याने पालघर, नाशिक आणि रायगड या भागातील आदिवासी तसेच ग्रामीण महिलांसाठी त्यांच्या अंगभूत कौशल्याचा आणि स्थानिक संसाधनाचा वापर करून संधीचा विस्तार करण्यात येणार आहे. ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी उमेदसह विविध योजना, उपक्रम राबविले जात आहेत. राह फाऊंडेशन सोबतच्या सामंजस्य कराराने या तीन जिल्ह्यांतील महिलांना तांत्रिक ज्ञान, अद्ययावत माहिती यांच्या सहाय्याने अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने भरीव प्रयत्न करण्यात येणार आहे.

**कराराचा उद्देश**

या कराराचा उद्देश पालघर, नाशिक





आणि रायगड जिल्ह्यांतील महिलांना हवामान, स्मार्ट शेती, जलसुरक्षा आणि निसर्गाधारित उपजीविका उपक्रमांद्वारे सक्षम करणे आहे. राह फाउंडेशनचे तांत्रिक ज्ञान आणि उमेदच्या स्वयं-सहायता गटांचे विस्तृत जाळे यांचा समन्वय साधून ग्रामीण महिलांना साधन संपत्ती, प्रशिक्षण आणि बाजार पेठेतील संधी मिळतील.

**राबविण्यात येणारे उपक्रम**

या भागीदारीअंतर्गत तीनही जिल्ह्यांमध्ये दोन नर्सरी विकास व जैव-उत्पादन केंद्रे उभारली जाणार असून ५ हजारांहून अधिक महिला आणि शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. तसेच महिलांच्या सहभागाने फूड फॉरेस्ट प्रकल्प उभारला जाणार आहे, ज्यातून प्रत्येक महिलेला वर्षाला १ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

या उपक्रमांतर्गत वन धन योजना, पीएमएफएमई, एनएचएम, आरसेटीआय यासारख्या विविध शासकीय योजनांशी एकत्रिकरण करून महिला शेतकऱ्यांना कर्ज, विमा, बाजारपेठ व प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाणार आहे.

उमेद-एमएसआरएलएम आणि राह फाउंडेशनचे हे सहकार्य महाराष्ट्राच्या व्हिजन २०३०, शाश्वत विकास उद्दिष्टे आणि राष्ट्रीय हवामान बांधिलकी यांच्याशी सुसंगत महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचे आदर्श मॉडेल निर्माण करण्याकडे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

## विविधतेतून एकता साधण्यासाठी संविधानातील तत्वांचे आचरण केल्याशिवाय पर्याय नाही : शेळके



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण प्रगतीसाठीसंविधानहा पाया आहे. न्याय,समता,स्वातंत्र्य,बंधुताही सर्वोच्च मूल्ये आपण सर्वांनीच अभ्यासली पाहिजेत,सन्मानाने जगण्यासाठी राज्यघटनेतील सर्वच कलमांचा विचार करणे आवश्यक आहे.प्रत्येक शब्दाला एक उचित अर्थ असल्याने घटनेतील सर्वच तत्वे जाणून घ्यावीत,त्यांचा प्रसार करावा.कोणत्याही कलमाचा विचार केल्यास असे लक्षात येते की डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी किती सूक्ष्म अभ्यास करून प्रत्येकाच्या हिताचा विचार केला आहे. विविधतेतून एकता साधण्यासाठीसंविधानातील तत्वांचे आचरण केल्याशिवाय पर्याय नाही असे प्रतिपादन मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी केले.महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड येथे संविधान दिनाच्या कार्यक्रमानिमित्ताने ते बोलत होते.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाच्या वतीने पालखेड गावातून एकता रॅली, रांगोळी स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य फलक, संविधान उद्देशिकेचे वाचन आदी कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक अशोक शेळके,निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे,राहुल दवते,वैशाली मोते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव,संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार,नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते,

## थोडक्यात...

### तरुणाला मारून दुचाकी पळवली, गुन्हा दाखल

सोलापूर : टेपू ऊर्फ अशरूफअली मन्नान बागवान याला २०२४ मध्ये तडीपार करण्यात आले आहे. हा टेपू विना-परवाना शहरात येऊन विजापूर वेसेतील तरुणाला मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता त्याची दुचाकी चोरली. या प्रकरणी सोहेल मुनाफ पिरजादे (वय ३०, रा. सेंट्रल अपार्टमेंट, पाथरूट चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून टेपूवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. त्याला पोलिसांनी अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता, त्याला कोर्टाने न्यायालयीन कोठडी सुनावली. ही घटना सोमवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घडली.तडीपार टेपू हा विनापरवाना शहरात आला.तो घरी जात असताना विजापूर वेस येथे सोहेल याच्याशी वाद झाला. यामुळे त्याला मारहाण करून त्यांची ऐंशी हजाराची दुचाकी त्याने जबरदस्तीने चोरून नेली. आरोपीला पोलिसांनी तात्काळ अटक केली. त्याच्याकडून चोरीतील दुचाकी ही जप्त केली. त्याला पोलिसांनी न्यायालयात हजर केले. या घटनेचा तपास सपोनि विजय जाधव करत आहेत.

### सासऱ्याने जावयावर केला चाकू हल्ला, गुन्हा दाखल

सोलापूर : विजापूर रोड येथील ए जी पाटील कॉलेज परिसरात माझ्या मुलीच्या नावे असलेले घर का विकू देत नाही या कारणातून सासऱ्याने जावयावर चाकूने हल्ला केल्याची घटना २५ नोव्हेंबर रोजी रात्री सात वाजता घडली. याप्रकरणी राजेश सिंहा राठोड (वय ४९, रा. सुरवसे पार्क, ए जी पाटील कॉलेजच्या मागे विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून शिवाजी सित-राम पवार (रा. प्रताप नगर, विजापूर रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी राजेश राठोड यांचे सासरे संशयित आरोपी शिवाजी पवार हे फिर्यादीला तू माझ्या मुलीच्या नावे असलेले घर का विकू देत नाही या कारणावरून फिर्यादीच्या डाव्या हाताला व डाव्या पायाला चाकूने वार करून जखमी केले. तसेच तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणून फिर्यादी राजेश राठोड याला दमदाटी करून निघून गेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# शालेय विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी एसटीची हेल्पलाईन सुरू

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती; १८००२२१२५१ हेल्पलाईन क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींना घरातून शाळेला जाताना अथवा शाळेतून घरी येताना एसटी प्रवासात काही अडचण आल्यास अथवा एसटी बसेस वेळेवर न आल्यास, अचानक रद्द करण्यात आल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी यासाठी एसटी महामंडळाची ' १८००२२१२५१ या क्रमांकाची हेल्पलाइन ' सुरू करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली.




राज्यभरातील लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना एसटी महामंडळ शाळेत जाण्यासाठी व तेथून घरी येण्यासाठी बस फेऱ्या उपलब्ध करून देत असते. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना घरातून शाळेला जा - ये करण्यासाठी मासिक पास मध्ये ६६.६६ % सवलत दिली जाते. तसेच ' पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ' योजनेंतर्गत बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत मासिक पास दिला जातो.

तथापि, परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली असता, तेथे उपस्थित असणाऱ्या शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींनी अनेक समस्या व तक्रारी मंत्री महोदयांसमोर मांडल्या . अनेक शालेय बसेस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बसेस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार त्यातील काही विद्यार्थ्यांनी केल्या . तसेच संध्याकाळच्या वेळी शाळा -महाविद्यालय सुटल्यानंतर किमान एक तासात मुले आपल्या घरी जाणे अपेक्षित असते. परंतु, बसेस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास खूप उशीर होतो. त्यामुळे त्यांना त्यांच्या पालकाचे ओरडे खावे लागतात. अनेक ठिकाणी तर गैरसमजातून पालकांनी विद्यार्थ्यांना उशिरा येण्याबद्दल शिक्षाही दिलेल्या आहेत. याचा विपरीत परिणाम म्हणून काय विद्यार्थिनींनी आत्महत्या केल्याच्या घटना देखील घडलेल्या आहेत.

विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी १८००२२१२५१ या क्रमांकावर एसटीची हेल्पलाईन सुरू झाली आहे.

शालेय विद्यार्थी -विद्यार्थिनींना आपल्या घरातून शाळेत जात असताना अथवा शाळेतून घरी येत असताना बसेस उशिरा सुटणे, त्या अचानक रद्द होणे ,तांत्रिक बिघाडामुळे बस नादूरूस्त झाल्याने घरी पोहोचण्यास अडचण निर्माण झाल्यास त्यांनी तातडीने एसटीच्या हेल्प-लाइन क्रमांक वर संपर्क करून मदत घ्यावी या हेतूने १८००२२१२५१ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात आलेला आहे. तरी या क्रमांकावर विद्यार्थी - विद्यार्थ्यांनींनी संपर्क साधावा, जेणेकरून त्यांना तातडीने मदत उपलब्ध करून देता येईल. असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. तसेच ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे दुरध्वनी संपर्क क्रमांक संबंधित शाळा, महाविद्यालयांना देण्यात येत आहेत. जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक तसेच थेट विद्यार्थी- विद्यार्थ्यांनी देखील या विभाग नियंत्रकांना संपर्क करून आपल्या समस्या मांडू शकतात.



विद्यार्थ्यांच्या शालेय नुकसानीची जबाबदारी आगार व्यवस्थापकावर

एसटी बसेस उशिरा सुटणे, अचानक रद्द होणे अथवा अन्य कारणामुळे शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींचे तास चुकतात किंवा परीक्षेला ते वेळेवर पोहोचू शकत नाहीत, काही वेळेला त्यांची महत्त्वाची परीक्षा देखील बुडते .

विद्यार्थ्यांच्या अशा शालेय नुकसानीला संबंधित क्षेत्रातील आगार व्यवस्थापक व त्यांचे पर्यवेक्षक यांना जबाबदार धरण्यात येईल! या पुढे सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी ५-६ या वेळेत मुख्य बसस्थानक व ज्या ठिकाणी विद्यार्थी चढ-उतार जास्त होतो अशा थांब्यावर संबंधित आगाराच्या पर्यवेक्षकांनी गण-वेशात थांबून वाहतुकीचे नियोजन करावे. शाळेचा शेवटचा मुलगा अथवा मुलगी बस मधून सुखरूप घरी जाईपर्यंत संबंधित पर्यवेक्षकांनी तेथून हलू नये! अशा सक्त सूचना मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशास-नाला दिलेल्या आहेत. तसेच शालेय बस फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनामूळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची लेखी तक्रार संबंधित विद्यार्थी अथवा विद्यार्थिनींनी तसेच संबंधित शाळा- महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी केल्यास जितक्या दिवसाचे शालेय नुकसान होईल, तितके दिवस यास जबाबदार असणारे पर्यवेक्षक अथवा अधिकार्यांना निलंबित अथवा सक्तीचे रजेवर पाठवण्यात यावे. असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या महाव्यवस्थापक (वाहतूक) यांना दिले आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वस्तीगृहात संविधान दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

मेहकर तालुक्यातील खंडाळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वस्तीगृहात २६ नोव्हेंबर संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वस्तीगृहाचे प्रभारी ग्रहपाल आर. सी. मखरीचे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



यानंतर संविधान दिनानिमित्त खंडाळा गावातून भव्य रॅली काढण्यात आली. देशाची शान भारत संविधान वंदे मातरम अशा घोषणांनी गाव उत्साहात न्हाऊन निघाले. विद्यार्थ्यांनी तयार केलेली संविधानविषयक पोस्टर्स आणि फलक रॅलीचे विशेष आकर्षण ठरले. ही पोस्टर्स उमेश शिरभैय्ये व चंद्रकांत अंभोरे यांनी तयार केली होती.

रॅलीत वस्तीगृहातील मधुकर पोपळघट यांच्यासह अनेक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यामध्ये उमेश शिरभैय्ये, जय शिरभैय्ये, प्रतीक शिंगणे, चंद्रकांत अंभोरे, सोमराज चरवे, शुभम इंगळे, लक्ष्मण हातागळे, सुदर्शन गायकवाड, कार्तिक वाघमारे, कुणाल गायकवाड, रोशन इंगळे, आशिष इंगळे, अविनाश बेटके, कृष्णा दालु, रोहित गवई, यश साठे, निर्भय सभादिंडे, सुरज पांडगळे, हरीओम पदमने, सुरज करे आदी विद्यार्थ्यांचा समावेश होता.

कार्यक्रमावेळी वस्तीगृहातील संपूर्ण कर्मचारीवर्ग उपस्थित होता.

## संविधान दिनी राजभवन येथे राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय संविधान दिनानिमित्त राजभवन येथे राज्य घटनेच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राजभवनातील अधिकारी, कर्मचारी यांच्यासमवेत राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, राज्यपालांचे परिसहायक, अभयसिंह देशमुख तसेच राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या कामांचे बिले मिळत नसल्याने लोदगा सरपंच पांडुरंग गोमारे यांनी किडनी विकण्याचा घेतला निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालक्यातील लोदग्याचे सरपंच पांडुरंग रामचंद्र गोमारे यांनी ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या कामाचे बिले मीळत नसल्याने स्वतःची किडनी विकुन, साहित्य खरेदी केलेले दुकानदार व मजुर यांचे पैसे देण्यासाठी स्वतची कीडणी विकण्याची जिल्हाधिकार्यांना निवेदनाद्वारे रीत-सर मागितली परवानगी.

औसा तालुक्यातील लोदगा ग्रामपंचायतचे सरपंच पांडुरंग रामचंद्र गोमारे यांनी लोदगा ग्रामपंचायत अंतर्गत अनेक विकास कामे केली असुन झालेल्या विकास कामांचे बिले दोन वर्षापासुन रखडले असुन साहित्य खरेदी केलेले दुकानदार व नरेगा अंतर्गत केलेली कामाचे मजुर हे पैशासाठी तगादा लावत असुन झालेल्या कामाची बिले निघत नसल्याने सरपंच पांडुरंग गोमारे यांनी आपली

ओ .पॉझिटिव्ह ब्लड ग्रुप असलेली किडनी विकण्यास रीतसर परवानगी मिळावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवेदनाद्वारे मागणी केली ,सरपंच पांडुरंग गोमारे यांनी लोदगा गावचा सर्वांगीण विकास कामे केली खरी पण केलेल्या कामाचे बिले मीळत नसल्याने सरपंच गोमारे यांनी आपली स्वतःची किडनी विकण्याचा निर्णय घेतला असून, सरपंचांनी सांगीतले मी माझ्या लोदगा गावचा मी सरपंच असल्यामुळे गावातील विकास कामे करण्याकरता एजन्सींना,मजुरांना व वाहनधारक यांना गावातील विकास कामे करण्यासाठी काही दुकानदाराकडुन साहित्य खरेदी केले होते यामध्ये सिमेंट दुकानदार ,खडी क्रेशर, स्टील ,दुकानदार यांच्याकडून साहित्य खरेदी करुन ग्रामपंचायतच्या माध्यमातुन लोदगा गावातील विकास कामे केलेली आहेत यामध्ये ९५/०५व २५/१५ जन सुविधा अनु जाती ,जमाती व नवबौद्ध घटकाच्या वस्तीचा विकास करण्यासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत केलेली कामे व तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत गावातील मजुरांनी केलेली कामे केलेली हे सर्व व्यक्ती व दुकानदार हे सरपंच गोमारे यांना आम्ही तुमच्या म्हणण्यानुसार गेली दोन वर्ष कामे केलेली आहेत तरी आम्हाला आमचे कामाचे व साहित्याचे बिल पैसे मिळत नाहीत, म्हणून सरपंचांना मानसिक त्रास देत आहेत, तरी लोदगा गावातील शेतकरी शेतमजूर यांना वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना मंजूर असून त्या योजना सिंचन विहीर ,जनावरांची



गोटे ,घरकुल लाभार्थी, अशा सर्व लाभार्थी यांनी हे कामे पूर्ण केलेली असून त्यांना अद्याप शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बिले निघण्यास विलंब होत असल्यामुळे शेतकरी व शेतमजूर वैयक्तिक लाभाचे काम करून अडचणीत सापडलेला आहे तरी या सर्व गोष्टीचा मानसिक ताण सरपंच म्हणून पांडुरंग गोमारे यांना सहन करावा लागत आहे.

मजुरांचे पैसे व साहित्य खरेदी केलेल्या दुकानदारांचे पैसे परतफेड करण्यासाठी सरपंच पांडुरंग गोमारे यांनी आपली स्वतःची किडनी विकण्याचा निर्णय घेत आज लातूर जिल्हाधिकारी यांना रीतसरपणे स्वतःची ओ .पॉझिटिव्ह ब्लड ग्रुपची किडनी विकण्यास रितसर पणे परवाणगी मिळणे बाबत निवेदन दिले असून या निवेदनाची दखल प्रशासनाकडून घेतली नाही गेल्यास मी माझी किडनी विकणार असल्याच यावेळी लोदगा गावचे सरपंच पांडुरंग रामचंद्र गोमारे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले,सरपंच असणार्या व्यक्तीला जर अशी वेळ आली तर या सरकारच्या काळात सर्वसामान्याच काय असा प्रश्न जनतेला पडला आहे.

## स्वेरीमध्ये 'राष्ट्रीय उद्योजकता दिन' साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये एमबीए व इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय उद्योजकता दिन' नुकताच साजरा करण्यात आला. या निमित्ताने स्वेरीतील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील बाजारपेठ आणि उद्योग- व्यवसायांची व त्यांच्या कार्यपद्धतीची समग्र माहिती मिळाली.

स्वेरी अंतर्गत असलेल्या संशोधन विभागाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दि.१० नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजिलेल्या या 'राष्ट्रीय उद्योजकता' दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यातील 'डीजीटेक रोबोटीक्स इंडीया प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अजित गटे हे होते.

दिपप्रज्वलानानंतर संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ.ए.पी.केने यांनी प्रास्तविकात 'राष्ट्रीय उद्योजकता दिना'चे महत्व सांगून जागतिक औद्योगिक क्षेत्रातील वस्तुस्थिती सांगितली.

प्रमुख पाहुणे व्यवस्थापकीय संचालक अजित गटे हे मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी करिअर करताना आपल्या नव्या कल्पनांना वाव देवून सध्याच्या जागतिक बाजारपेठ व त्यातील व्यवहार याबाबत सूक्ष्मपणे अभ्यास करणे आवश्यक आहे तसेच प्रत्येक क्षेत्रात यशस्वी नेतृत्व केल्यास मिळणाऱ्या यशाला गती येईल व जागतिक बाजारपेठेत आपल्या वस्तूला मोल येईल.' असे सांगून त्यांनी कंपन्यातील उत्पादने व केली जाणारी वाहतूक व्यवस्था यावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या 'राष्ट्रीय उद्योजकता दिन' कार्यक्रमात एमबीएच्या विभागप्रमुख डॉ. मिनल भोरे, डॉ. एच.बी.रोंगे यांच्यासह एमबीए विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उप-स्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. के. पी. कोंडुभैरी यांनी केले तर स्वेरीच्या इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) चे प्रमुख डॉ. डी.डी. रोंगे यांनी आभार मानले.




मुक्त विद्यापीठाच्या वतीने पुण्यतिथी निमित्त अभिवादन कार्यक्रम

मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन

# यशवंतराव चव्हाण यांचे कृषी,उद्योग व सहकार क्षेत्रातील कार्य वंदनीय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र सुजलाम सुफलाम व्हावा म्हणून सहकार, कृषी व औद्योगिक क्षेत्रात दिलेले योगदान वंदनीय आहे. त्यामुळे त्यांचे कार्य राज्यातील जनता कधीही विसरणार नाही. असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

**मुक्त विद्यापीठ ज्ञानदानात अग्रेसर**

**यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने कार्यरत असलेले मुक्त विद्यापीठ ज्ञानदानात अग्रेसर आहे, पदवी व पदव्युत्तर विषयाचे शिक्षण विद्यापीठा मार्फत दिले जाते, त्यामुळे शिक्षणापासून वंचित व उपेक्षित विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे खुली झाली आहेत असे गौरवोद्गार देखील मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी काढले.**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयांतर्गत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रात पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कालिदास वळसंगे, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर पहिले मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी शेतकरी, शेतमजूर, कामगार व सर्वसामान्य नागरिक यांना न्याय दिला. त्यामुळे राज्याची चौफेर प्रगती झाली ते विद्या व कलेचे उपासक होते. अफाट विद्वत्ता व नम्रता त्यांच्याकडे होती. त्यांचा समाजसेवक ते साहित्यिक असा जीवन प्रवास प्रेरणादायी आहे.

प्रारंभी यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बसवराज कामाठी यांनी केले, सूत्रसंचलन सरोजनी हारकुड यांनी केले तर आभार शरणय्या




मसुती यांनी मानले. कार्यक्रमास प्रा शिल्पा धूमशेट्टी, शितल फुटाणे उपस्थित होते.